# सार्वत्रिक जाहीरनामा

**कलम १**

सर्व मानवी व्यक्ती हया मुक्त अवस्थेत जन्म पावतात व त्यावेळी त्या सर्वाचा मानबिंदु-आत्मसन्मान तसेच त्यांचे अधिकार हे एकसमानच असतात. त्यास्तव आपल्या जीवनाचा कार्यकारणभाव ओळखुन तसेच जाणीवपुर्वक त्यांनी एकमेकांशी-परस्परांशी बंधुत्वाच्या भावनेने वागले पाहिजे.

**कलम २**

कोणत्याही प्रकारे लिंग, वर्ण, वंश, जात-पात, भाषा, धर्म-पंथ, राजकीय अथवा अन्य मतधारणा, राष्ट्रीयता अथवा सामाजिक मुळ, मालमत्ता, जन्म अथवा अन्य कोणतीही अवस्था असा कोणताही भेदभाव न करता प्रत्येकाला सदर जाहीरनाम्यामध्ये नमुद कलेले सर्व प्रकारचे अधिकार तसेच त्या अधिकारांचा वापर करण्यात पूर्णतः स्वातंत्र्य बहाल करण्यात आलेले आहे. अधिक स्पष्ट करून सांगावयाचे झाल्यास असे म्हणता येइल की व्यक्ती मग ती स्वतंत्र व्यक्तीमत्वाची अशी असो, विश्वस्थवृत्तीची असो, स्वतःच्या नियंत्रणाखालील नसो अथवा कोणत्याही अन्य सार्वभौमत्वाखालील व्यक्ती असो मात्र त्याचा कोणताही वेगळा विचार न करता म्हणजेच त्या व्यक्तीची राज अधिकारात्मक अथवा आंतरराष्ट्रीय स्थिती वा प्रतिमा लक्षात न घेता सदर व्यक्तीच्या बाबत कोणताही भेदाभेद न करता प्रत्येक व्यक्तीला समान अधिकार बहाल करण्यात आलेले आहेत.

**कलम ३**

प्रत्येकाला जगण्याचा, मुक्तपणे वावरण्याचा तसेच व्यक्तीगत सुरक्षा प्राप्त करण्याचा अधिकार आहे.

**कलम ४**

कोणाही व्यक्तीला तीच्या इच्छेविरुध्द गुलाम बनविले जाणार नाही अथवा दुसर्याच्या जोखडाखाली त्या व्यक्तीला जगावे लागणार नाही; तद्वत गुलामगिरी आणि गुलामीचा धंदा कोणत्याही स्वरुपात चालविण्यास सक्त मनाई राहील.


103, Tirupati Plaza, A/212c, Street No 1, Shakarpur, Vikas Marg, Delhi – 110092.
P: +91 11 22433212 C: +91 9769926275 E: info@ihrc.in W: www.ihrc.in

**कलम ५**

कोणालाही अन्य कोणत्याही व्यक्तीला छळण्याचा अथवा क्रुरपणे वागविण्याचा, अमानवी पध्दतीने वागविण्याचा किंवा त्या व्यक्तीस अपमानास्पद वागणुक देण्याचा किंवा शिक्षा करण्याचा अधिकार नाही.

**कलम ६**

कायद्यासमोर सर्व सारखेच असुन प्रत्येकाला कोठेही आपली ओळख पटविण्याचा अधिकार राहील.

**कलम ७**

सर्व जण कायद्यासमोर सारखेच गणले जातील व त्यांच्यामध्ये कोणताही भेदभाव न करता कायद्यानुसार सर्वांना सुरक्षा प्राप्त करण्याचा सारखाच अधिकार राहील.

**कलम ८**

घटनेद्वारा अथवा कायद्याने बहाल कलेल्या स्वतःच्या मुलभुत अधिकारांच्या आड येणार्या वा अडथळा निर्माण करणार्याk कोणत्याही कृत्यांविरोधात परिणामकारक उपाययोजना सक्षम राष्ट्रीय मंचाकडून करविण्याचा अधिकार प्रत्येकास राहील.

**कलम ९**

कोणालाही योग्य त्या चौकशीविना अटक करता येणार नाही; डांबुन ठेवता येणार नाही किंवा पदच्युत करता येणार नाही.

**कलम १०**

स्वतःच्या विरोधात करण्यात आलेल्या आरोपांसंदर्भात आपले हक्क तसेच जबाबदार्याg निश्चित करण्यासाठी स्वतंत्र व निष्पक्ष मंचाद्वारे खुल्या व मोकळया वातावरणात सार्वजनिक सुनावणी करवुन घेण्याचा समान अधिकार प्रत्येकाला पुर्णतः राहील.

## कलम ११

१. कोणाही व्यक्तीवर एखाद्या विशिष्ट कलमाखाली गुन्हा नोंदला गेल्यास अशावेळी कायद्यानुसार सदर गुन्हा निर्विवादपणे सिध्द होइपर्यन्तच्या कालावधीमध्ये सार्वजनिक उचित सुनावणी स्वतःच्या बचावासाठी सर्वतोप्रकारे प्रयत्न करुन आपले स्वतःचे निरपराधित्व शाबीत करण्याचा अधिकार प्रत्येकास राहील.

२. राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय कायद्यानुसार कोणाही व्यक्तीकडून कोणतेही असे दोषकृत्य अथवा कायद्याचा नियम अनावधानाने न पाळणे अशी गुन्हयाची घटना घडल्यास अशावेळी अशा कृत्याबाबतीत कोणत्याही कलमाखाली सदर व्यक्तीस दोषी ग्राहय मानता येणार नाही तसेच अशा गुन्हयाबद्द्ल मोठी सजा वा दंड ठोठाविता येणार नाही.

## कलम १२

कोणाही व्यक्तीच्या खाजगी जीवनात, कुटुंब-घर अथवा पत्रव्यवहारासंदर्भात कोणत्याही योग्य व उचित चौकशीविना हस्तक्षेप कोणालाही करता येणार नाही. तद्वत त्या व्यक्तीच्या मानबिंदूस व आत्मसन्मानास धक्का पोहचविता येणार नाही. प्रत्येक व्यक्तीस तशा हस्तक्षेप वा हल्ल्याविरोधात कायदेशीर संरक्षण प्राप्त होण्याचा अधिकार राहील.

## कलम १३

१. प्रत्येक राज्याच्या सीमाक्षेत्रामध्ये फिरण्याचा तसेच राहण्याचा अधिकार प्रत्येकास राहील.

२. स्वदेश सोडुन कोठेही परदेशी जाण्याचा तसेच स्वदेशी परतण्याचा अधिकार प्रत्येकास राहील.

## कलम १४

१. अन्य देशांमध्ये मौजमजा करण्यासाठी जाण्याचा तसेच तेथे कायदेशीर मदत प्राप्त होण्याचा अधिकार राहील.

२. खर्या;खुर्या अराजकीय गुन्हयांपासुन उद्भवणार्या- गुन्हयांच्या प्रकरणी किंवा संयुक्त राष्ट्रांच्या हेतु व सिंध्दांतांचा भंग करणार्याj कृत्यांच्या संदर्भात सदर वरील नमुद केलेला अधिकार रद्दबातल होणार नाही.

**कलम १५**

१. प्रत्येकास आपापल्या राष्ट्रीयत्वाचा अधिकार प्राप्त राहील.

२. कोणाही व्यक्तीचे राष्ट्रीयत्व त्याचेकडून विनाचौकशी काढून घेण्यात येणार नाही. तद्वत सदर व्यक्तीस त्याचे राष्ट्रीयत्व त्याच्या स्वेच्छेने बदलु देण्यास विरोध केला जाणार नाही.

**कलम १६**

१. वर्ण, राष्ट्रीयत्व किंवा धर्म अशा कोणत्याही मर्यादांचा अटकाव वा अडथळा न येता सर्व प्रौढ वयाच्या स्त्री-पुरुषांना विवाह करुन स्वतःचे वेगळे असे स्वतंत्र कुटुंब स्थापण्याचा अधिकार राहील. तसेच त्यांना त्यांच्या वैवाहिक आयुष्याच्या तद्वत सदर विवाह संपुष्टात आल्यानंतरच्या अशा दोनही कालावधीमध्ये त्यांना समान अधिकार प्राप्त राहतील.

२. संबंधित नियोजित वर-वधु हयांच्या केवळ पुर्ण स्वेच्छासंमतीनेच त्यांच्या विवाहाची नोंदणी करण्यात येइल.

३. कुटुंब हा नैसर्गिकरित्या तसेच समाजाचा सैध्दांतिक गट होय आणि त्यास्तव सदर कुटुंब हे समाजाकडून व राज्याकडून संरक्षण प्राप्त होण्यास हक्कदार व अधिकारप्राप्त राहील.

**कलम १७**

१. प्रत्येकाला स्वतःच्या मालकीची मालमत्ता बाळगण्यास तसेच अन्य व्यक्तींसोबत एकत्रितपणे मालमत्ता बाळगण्याचा अधिकार राहील.

२. कोणाही व्यक्तीची मालमत्ता सदर व्यक्तीकडून विनाचौकशी त्याच्यापासुन हिरावुन घेतली जाणार नाही.

**कलम १८**

प्रत्येकास विचाराचे तसेच श्रध्दा/आस्था बाळगण्याचे व स्वतःचा धर्म अंगिकारण्याचा अधिकार आहे व त्यामध्ये धर्मांतराचा हक्क वा आस्था-श्रध्दाबदल करण्याचा हक्क, वैयक्तिकरित्या अथवा समाजातील अन्य अनेक व्यक्तींसोबत तसेच सार्वजनिक किंवा खाजगीरित्या स्वतःच्या धर्माचे पालन किंवा श्रध्दा, आस्था, शिकवण, प्रार्थना व आचरणाचे स्वातंत्र्या हया गोष्टींचाही अंतर्भाव राहील.

**कलम १९**

प्रत्येक व्यक्तीस आपले स्वतःचे मत मांडण्याचा व भावना व्यक्त करण्याचा अधिकार राहील. सदर अधिकारामध्ये कोणाच्याही हस्तक्षेपाशिवाय स्वतःचे मत राखण्याचे स्वातंत्र्य तसेच कोणत्याही प्रसारमाध्यमांकडुन व कोणत्याही अडथळयांविना माहिती मागण्याचा व ती मिळविण्याचा तसेच माहितीचे आदान-प्रदान करण्याचा हक्क असणे हया बाबींचाही समावेश त्यामध्ये होतो.

**कलम २०**

१. प्रत्येकास शांततापुर्णरित्या एकत्रित येवुन स्नेहसंमेलन भरविण्याचा अधिकार राहील.

२. सदर एकत्रित येण्यास अथवा स्नेहसंमेलनामध्ये सहभागी होण्याची सक्ती कोणावरही केली जाणार नाही.

**कलम २१**

१. प्रत्येकास प्रत्यक्षरित्या किंवा खुल्या निवडणुकीद्वारे निवडुन आलेल्या प्रतिनिधींमार्फत त्याच्या स्वतःच्या देशाच्या सरकारमध्ये सहभाग घेता येइल.

२. आपल्या स्वतःच्या देशातील सार्वजनिक सेवेमध्ये समान वाव प्राप्त होण्याचा अधिकार प्रत्येकास राहील.

३. लोकेच्छा हाच शासनाचा मुलाधार राहील. सदर लोकेच्छेचे प्रतिबिंब नियमित कालावधीमध्ये येणार्याr निवडुकांमध्ये उमटेल व सदर लोकेच्छा हीच स्थायी तसेच प्रमाणसिध्द मानली जाईल; व सदर लोकेच्छा ही मतदानाद्वारे प्रगट होईल अथवा तत्सम मतप्रणालीद्वारे दिसुन येइल.

**कलम २२**

समाजाचा एक घटक हया नात्याने प्रत्येकास सामाजिक सुरक्षा प्राप्त होण्याचा अधिकार राहील व स्वतःचा आत्मसन्मान तसेच व्यक्तीमत्व विकास होण्यासंदर्भात राष्ट्रीय प्रयत्न, आंतरराष्ट्रीय सहकार्य तसेच निरनिराळया संस्था आणि प्रत्येक राज्याचे आर्थिक, सामाजिक व सांस्कृति विकासाचे स्त्रोत हयांचा वापर करण्याचा अधिकारही प्रत्येकास राहील.


103, Tirupati Plaza, A/212c, Street No 1, Shakarpur, Vikas Marg, Delhi – 110092.
P: +91 11 22433212 C: +91 9769926275 E: info@ihrc.in W: www.ihrc.in

**कलम २३**

१. प्रत्येकास काम करण्याचा, मुक्तपणे नोकरीची निवड करण्याचा, कामाच्या ठिकाणी न्याय वागणुक तसेच लाभप्रद वातावरण स्थिती प्राप्त करण्याचा अधिकार राहील.

२. कोणत्याही प्रकारे भेदभाव न होता प्रत्येकास समान कामासाठी समान वेतन प्राप्त करण्याचा अधिकार राहील.

३. प्रत्येक काम करणार्याkस त्याच्या स्वतःकरिता तसेच त्याच्या कुटुंबाकरिता, मानवी आत्मसन्मान राखुन जगण्यासाठी जरूरी असे तसेच आवश्यकतेनुसार वाढीव पगारवाढींनी युक्त असा मेहनताना/पगार प्राप्त होण्याचा व दुसर्याvअर्थी सामाजिक सुरक्षा मिळविण्याचा अधिकार राहील.

४. आपल्या स्वतःच्या हितसंबंधांचे रक्षण करण्याकरिता धंदेवाईक कामगार संघटना बांधणे तसेच अशा संघटनेत सामिल होण्याचा अधिकार प्रत्येकास राहील.

**कलम २४**

कामाचे रास्त तास व नियमित मिळणार्याj भरपगारी रजा जमेस धरता प्रत्येकास विश्रांती घेण्याचा व आनंदोपभोग घेण्याचा अधिकार राहील.

**कलम २५**

१. स्वतःचे तसेच आपल्या कुटुंबाचे आरोग्य व प्रकृती उत्तम राखण्याकरीता ज्यामध्ये अन्न-वस्त्र-निवारा तसेच औषधी सेवा तसेच जरूरी समाजसेवा तसेच बेकारीच्या विरोधात सुरक्षा प्राप्त होणे, आजारपण, अपंगत्व, वैधव्य म्हातारपण किंवा परिस्थितीनुसार जीवनात उद्‌भवणार्याk संकटांना सामोरे जाण्यासाठी बळ मिळणे हयांचाही समावेश होतो अशा सर्व बाबी प्राप्त होवुन पुरेसे मानद स्वरूपाचे जीवन जगायला मिळण्याचा अधिकार प्रत्येकास आहे.

२. मातृत्व प्राप्त होण्याच्या कालावधीमध्ये तसेच बालपणी प्रत्येकास विशेष जपणुक व मदत होण्याचा अधिकार राहील. विवाहबंधनाव्दारे अथवा विवाहबाहय जन्मणार्या” सर्वच मुलांना सदरचेच सामाजिक संरक्षण प्राप्त होण्याचा अधिकार राहील.

**कलम २६**

१. प्रत्येकास शिक्षणाचा अधिकार राहील. किमान प्राथमिक व सैध्दांतिक पातळीवर तरी शिक्षण हे विनामुल्य राहील. प्राथमिक शिक्षण हे सक्तीचे राहील. तांत्रिक व धंदेवाईक शिक्षण हे सामान्यतः उपलब्ध करून दिले जाईल तसेच उच्च शिक्षण हे गुणवत्तेच्या आधारावर सर्वांस अशाप्रकारे उपलब्ध राहील.

२. शिक्षण हे मानवी व्यक्तीमत्व विकासाच्या वाढीसाठी निर्देश देत राहील. मानवी हक्क व मुलभुत स्वातंत्र्य वाढीस लागण्यासाठी शिक्षणाद्वारे विद्यार्थ्यांची व सर्वांचीच ग्रहण शक्ती वाढविण्यात येईल. स्वसंतुलन तसेच राष्ट्रा-राष्ट्रांतील मैत्री वाढणे, वर्ण, धार्मिक गट हयांच्यामध्ये सामंजस्य निर्माण होवुन संयुक्त राष्ट्रांच्या शांतीस्थापनेच्या प्रयत्नांना उजाळा देण्याचे काम शिक्षणाद्वारे घडेल.

३. आपल्या मुलांना दिल्या जाणार्याSशिक्षणाच्या पध्दतीबाबत निवड करण्याचे स्वातंत्र्य वा अधिकार सर्व पालकांना राहील.

**कलम २७**

१. प्रत्येकास समाजाच्या सांस्कृतिक जीवनामध्ये सहभागी होण्याचा अधिकार राहील व त्यासाठी प्रत्येकास कलाशाखांमधील कार्यक्रमांमध्ये सहभागी होता येईल तसेच वैज्ञानिक प्रगती व त्यामधील लाभ पदरात पाडुन घेता येतील.

२. ज्याचा तो लेखक आहे अशा कोणत्याही वैज्ञानिक, साहित्तिक किंवा कलाकृतीसंदर्भातील नैतिक व भौतिक हितसंबंधांची जपणुक करण्याचा प्रत्येकाला अधिकार राहील.

**कलम २८**

ज्यामध्ये हक्क व स्वातंत्र्य हयांची सांगड घातलेली आहे त्या हया जाहीरनाम्यानुसार प्रत्येकास सामाजिक व आंतरराष्ट्रीय मापदंड प्राप्त करण्याचा अधिकार प्राप्त झालेला आहे.

**कलम २९**

१. आपला ज्या समाजामध्ये मुक्त व पुर्ण व्यक्तीमत्व विकास घडतो त्या समाजाप्रती आपली स्वतःची जबाबदारीची भुमिका पार पाडण्यास प्रत्येक जण बांधिल राहील.

२.	आपले हक्क व स्वातंत्र्य पार पाडतांना मर्यादांच्या सापेक्ष वागावे लागते म्हणजेच मान्यताप्राप्तीसाठी कायद्याची बांधिलकी राखणे व अन्य व्यक्तींच्या हक्क-कर्तव्यांची बुज राखणे तसेच नेहमीच नैतिकतेच्या न्याय बाबींना पाठिंबा देणे, सार्वजनिक आदेशांचे पालन सर्वांच्या सामायिक कल्याणाच्या प्राप्तीस्तव लोकशाही समाजव्यवस्थेमध्ये अत्यंत अनिवार्य बाब आहे.

३.	संयुक्त राष्ट्राच्या हेतु व सिध्दांतांना धक्का पोहचविणार्या कोणत्याही कृत्यांसाठी सदर हक्क व स्वातंत्र्य हयांचा दुरूपयोग कधीही केला जाणार नाही हयाबाबत प्रत्येकाने दक्षता बाळगली पाहिजे.

**कलम ३०**

कोणतेही राज्य, गट अथवा व्यक्ती हयांना आपल्या तालावर/इशार्यावर नाचविण्यासाठी त्यांच्यावर सक्ती करून आपल्याला हवे तसे वागण्यास भाग पाडण्याकरिता थोडक्यात सदर जाहीरनाम्यामध्ये नमुद केलेल्या हक्क व स्वातंत्र्याच्या कलमांना नष्ट करण्याकरिता आपल्या सोयीनुसार सदर जाहीरनाम्यातील कलमांचा गैरवापर कोणीही करू नये.


103, Tirupati Plaza, A/212c, Street No 1, Shakarpur, Vikas Marg, Delhi – 110092.
P: +91 11 22433212 C: +91 9769926275 E: info@ihrc.in W: www.ihrc.in